**MHAU060025502025**

**फौजदारी किरकोळ अर्ज/327/2025 देवगांव रंगारी**
**योगेश आबाराव निकम वि.. महाराष्ट्र शासन**

## <u>निशाणी १ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज देवगांव रंगारी पोलीस ठाणे गु.र.क्र.१६२/२०२५ च्या अनुषंगाने गुन्ह्यातील वापरण्यात आलेले व जप्त बोलेरो पिकअप वाहन ज्याचा नोंदणी क्र.एम.एच.२० जी.सी. ८३०५ असा आहे, त्याचा ताबा मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

२. अर्जदार याच्या मालकीची महिंद्रा कंपनीची पांढ–या रंगाची बोलेरो पिकअप चारचाकी गाडी जीचा नोंदणी क्र..एम.एच.२० जी.सी. ८३०५ असा आहे. त्याचे विस्तृत वर्णन अर्जदाराने अर्जाच्या परिच्छेद क्र.३ मध्ये केलेले आहे. अर्जदार सदर गाडीचा मालक व ताबेदार आहे. दि.०४.११.२०२५ रोजी सदर वाहन उपरोक्त गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे अज्ञात व्यक्ती विरोधोत कलम ११(१)(d), ११(१)(e), ११(१)(f), ३८ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

३. सदर वाहन पोलीस ठाणे देवगांव रंगारी येथे धुळ खात पडलेले आहे. सदर वाहनाची गरज अर्जदार यांना आहे. अर्जदाराचा गुन्हयाशी संबंध नाही. सदर वाहन हे असेच पडून राहिल्यास खराब होवू शकते. तसेच त्यामुळे अर्जदार याचे आर्थिक नुकसान होत आहे. सबब, योग्य त्या अटी व शर्तीवरती वाहन सोडून देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली.

**सरकारी वकिल यांचे म्हणणेः–**

४. सरकारी वकिल यांनी आपले विस्तृत असे म्हणणे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणेच सदर गुरांना लागू असणारा कायदा आणि मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या मते ज्या स्वरुपात गुरे वाहनात मिळून आलेली आहे त्यामधून सदर जनावरांच्या संदर्भात प्रथमदर्शनी गुन्हा घडलेला आहे. अज्ञात आरोपीने सदर गुरांना वाहतुक करण्याच्या अनुषंगाने जो नियम शासनाने लादला त्याचादेखील भंग केलेला आहे. सबब, सदर वाहन हमी म्हणून जप्त करणे व वाहन चालक मालक आणि गुरांचे मालक यांनी गुरांचा खर्च द्यावा अशा स्वरुपाची मागणी केलेली आहे.

**तपासिक अधिकारी यांचे म्हणणेः–**

५. या अर्जाला तपासिक अधिकारी यांनी असे म्हणणे सादर केलेले आहे की, सदर गुरे आणि वाहन हे दि.०४.११.२०२५ रोजी जप्त करण्यात आलेले आहे. ज्यावेळेस गुरे जप्त करण्यात आली त्यावेळेस गाडीचा चालक गाडी सोडून निघून गेला. गाडीमध्ये ७ गौवंश जातीची गुरे मिळून आली. त्यांच्या खाण्यापिण्याची कोणतीही सोय करण्यात आली नव्हती. सदर गुरे अत्यंत क्रुरपणे वाहनात भरली होती. त्यामध्ये ७ गायी होत्या. सदर वाहन पुन्हा सोडल्यास त्याचा वापर गुन्हयाकरीता होवू शकतो. सबब, सदर वाहन बाबत योग्य तो आदेश करण्यात यावा अशी बाजु त्यांनी मांडली. त्यांनी पुढे असे नमूद केले की, सदर गुरे ही देखभालीकरीता अहिंसा सेवा संस्था गौशाळा लासूर स्टेशन देवगांव येथे पाठविण्यात आलेली आहे. त्यापैकी एक जनावर हे नैसर्गिक आजाराने मयत देखील झालेले आहे.

६. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गुरांची वाहतुक

बेकायदेशीररित्या करण्यात आलेली आहे. वाहनामध्ये ७ गुरे मिळून आलेली आहेत. सदर वाहन पाहता त्यामध्ये ७ गुरे बसू शकत नाहीत. यावरुन गुरांना निर्दयीपणे छळवणूक करुन वाहतुक करण्यात आली असे प्रतित होते. त्यामुळे, प्राण्यांना क्रुरतेपासून प्रतिबंध (प्राण्यांची काळजी आणि देखभाल) नियम, २०१७ मधील नियमांचा भंग केलेला आहे असे दिसून येते. गाडीच्या चालकाने प्राणी वाहतुक नियम, १९७८ चे नियम ४६ ते ५६ चा भंग केल्याबाबत स्पष्टपणे दिसून येते. एकंदरीत परिस्थितीमध्ये कायद्यातील तरतुदींच्या विपरीत परिस्थितीमध्ये गुरांची छळवणूक होईल अशा स्वरुपात गुरांची वाहतुक करण्यात आली असे प्रथमदर्शनी दिसून येते. या वाहतुकीला गाडीचा चालक जबाबदार आहे असे दिसून येते. आता गाडीचा मालक याचा गुन्ह्याशी संबंध आहे अशा स्वरुपाची कोणतीही बाब तपासिक अधिकारी यांनी नमूद केलेली नाही. मात्र, वाहनाचा वापर हा गुन्हयाच्या कामी करण्यात आलेला आहे आणि प्राण्यांना क्रुरतेपासून प्रतिबंध (प्राण्यांची काळजी आणि देखभाल) नियम, २०१७ मध्ये दिलेल्या तरतूदींप्रमाणे गुरांच्या औषध उपचार आणि अन्न आणि चारापाणी याच्या खर्चाची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे.

७. एकंदरीत परिस्थितीमध्ये गुरांचा मालक आणि गाडी चालक हे त्या गोष्टीस जबाबदार आहे असे दिसून येते. आता गाडी सोडण्याच्या प्रश्नाचा विचार केला असता गाडी मालक हा गुन्हयाशी थेट संबंधीत नसला तरी त्याच्या गाडीचा वापर या गुन्हयात करण्यात आलेला आहे. प्राण्यांना क्रुरतेपासून प्रतिबंध ( प्राण्यांची काळजी आणि देखभाल) नियम, २०१७ मधील तरतुदींनुसार गाडी मालक तसेच गाडी चालक हे वाहतुकीसाठी संयुक्तीकरित्या जबाबदार राहतात अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे, ज्याअर्थी सदर गाडीचा वापर करण्यात आलेला आहे त्याअर्थी आता गाडी मालक अशी भूमीका घेवू शकत नाहीत की, त्याच्या

गाडीचा वापर कधी झाला याची त्याला कल्पना नाही. असे केल्यास गुरांच्या जबाबदारीच्या अनुषंगाने कायद्यातील तरतूदीत नेमूण दिलेल्या बाबींना अत्यंत चालाकीने बगल देण्याचा प्रयत्न होईल. सबब, अशा एकंदरीत परिस्थितीमध्ये मी खालील आदेश पारीत करतोः-

## आदेश

१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार याने प्रतिदिवस २००/- रुपये या दराने गुराच्या देखभालीबाबतचा खर्च दि.०४.११.२०२५ रोजी पासून आजपर्यंत प्रतीदिन प्रत्येक गुराकरीता २००/- असे रोजचे १,२००/- रुपये प्रतिदिन या दराने एकूण रक्कम रुपये १,८७,२००/- रुपये गौ-शाळेस एका महिन्याच्या आत द्यावे.

३. तद्नंतर इतक्याच दराने या प्रस्तुत खटला निकाली होण्यापर्यंत सदरची रक्कम त्यांनी गो-शाळेला देण्याकरीता न्यायालयात जमा करायची आहे. उपरोक्त नमूद रक्कम जमा करण्यापर्यंत आणि त्याअनुषंगाने योग्य ती हमी देण्यापर्यंत प्राण्यांना क्रुरतेपासून प्रतिबंध (प्राण्यांची काळजी आणि देखभाल) अधिनियम २०१७ मधील कलम ५ (४) प्रमाणे या गुन्हयातील जप्त वाहन हे हमी म्हणून तसेच पोलीसांच्या ताब्यात ठेवण्यात यावे.

४. अर्जदार याला असे निर्देशित करणेत येते की, उपरोक्त बाबींची पुर्तता केल्यावर त्याने रक्कम रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख रुपये मात्र) चे बंधपत्र खालील अटी शर्तीस आधीन

राहून करुन घ्यायचे आहे.

अ. अर्जदार याला न्यायालय जेव्हा निर्देशित करेल तेव्हा अर्जात नमूद जप्त वाहन न्यायालयात हजर करावयाचे आहे.

ब. अर्जदार याने जप्त वाहनामध्ये कोणताही बदल अथवा परिवर्तन करावयाचे नाही.

क. अर्जदार याने जप्त वाहन सदर खटल्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणासही विकावयाचे नाही.

ड. यात कसूर केल्यास सदरचे बंधपत्र सरकार जमा करणेत येईल.

५. पोलिसांनी संबंधित वाहनाचे विविध कोनांमधून रंगीत छायाचित्रे काढून, तसा पंचनामा करुन तो पंचनामा गुन्ह्याचे कामी अंतिम अहवालासोबत दाखल करावयाचा आहे.

६. येणे प्रमाणे अर्ज निकाली करण्यात येतो.

७. सदर सुपूर्तनामा बंधपत्र हे न्यायदंडाधिकारी यांचे आदेशानुसार केलेले असलेमुळे महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियम, १९५९ चे परिशिष्ठ २, नंबर ९ प्रमाणे रक्कम रु.१०/– न्यायालयीन शुल्क लावून सादर करावयाचे आहे.

८. सदरचे प्रकरण हे देवगांव रंगारी पोलीस स्टेशनचे गुन्हा रजिष्टर नं.१६२/२०२५ ला अनुसरुन दाखल होणा–या अंतिम अहवालासोबत ठेवावयाचे आहे.

९. प्रस्तुत प्रकरण ई–फायलिंगप्रणालीद्वारे दाखल असल्यामुळे पुढील तारखेला बंधपत्राची पुर्तता अर्जदारने ई–फायलिंगने

करावी.

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.04.09 12:09:43 +0530

कन्नड.                                        (वि. द. पाटील)

दिनांक : ०९/०४/२०२६                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कन्नड.

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | : | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | : | 09/04/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 09/04/2026 |
| Order uploaded on | : | 09/04/2026 |